# **महत्त्वाची सूचना**

**ऑनलाईन रजिस्ट्रेशन सिस्टीममध्ये अर्जदारांच्या सोयीसाठी पुढीलप्रमाणे काही बदल करण्यात येत आहेत**

**फार्मसी अर्जदारांनी कृपया लक्ष द्यावे**

**(दि. १० ऑक्टोबर २०१८ किंवा त्यानंतर नवीन पंजीकरणासाठीच्या अर्जदारांकरीता जे महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधून फार्मसी पदविका/पदवी/फार्म.डी. उत्तीर्ण झाले आहेत )**

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेने अर्जदाराना अर्ज दाखल करण्यासाठी दि. ७ ऑगस्ट २०१८ पासून ऑनलाईन रजिस्ट्रेशन सिस्टीम सुरू केली आहे आणि त्यास सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात आली आहे. परिषदेच्या संकेतस्थळावरही या प्रणालीत कशाप्रकारे कार्यवाही करावी याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

आतापर्यन्त ९०००पेक्षा अधिक अर्जदारांनी या प्रणालीतून अर्ज दाखल केले आहेत. या विषयी फार्मसी कॉलेजच्या प्राचार्यांकडून प्राप्त पत्र , दूरध्वनीवरून प्राप्त अभिप्राय आणि परिषदेच्या सदस्यांकडून प्राप्त प्रतिक्रिया यांचा आढावा परिषदेच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला आणि ऑनलाईन रजिस्ट्रेशन सिस्टीममध्ये दि. १० ऑक्टोबर २०१८ (बुधवार) पासून पुढीलप्रमाणे बदल करण्याचे या परिषदेचे भावी पंजीकृत औषध व्यवसायी म्हणून अर्ज दाखल करणाऱ्या अर्जदारांच्या सुविधेसाठी ठरविण्यात आले आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या पध्दतीनुसार, www.online.mspcindia.org या लिंकवर अर्जदाराने पडताळणीपूर्व अटी-शर्ती मान्य केल्यानंतर त्यास नांव, जन्मतारीख, भ्रमणध्वनी व ईमेल आयडी भरता येतो. त्याच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेशाद्वारे लॉग इन आयडी आणि पासवर्ड दिला जातो. लॉग इन आयडी आणि पासवर्डचा वापर करून अर्जदारास त्याची वैयक्तिक माहिती, शैक्षणिक माहिती, फोटो, सही आणि इतर कागदपत्र (माहितीपत्रकात आणि मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केल्यानुसार) भरून/अपलोड करून अर्ज भरण्याची कार्यवाही पूर्ण करता येते. ★ या बरोबरच, **आता करण्यात येत असलेल्या बदलामध्ये अर्जदाराने सदर प्रणालीत दिलेला प्रतिज्ञापत्र (undertaking)नमूना डाऊनलोड करावा, वाचून व त्यावर सही करून इतर कागदपत्रांसह अपलोड करावा. त्यामध्ये अर्जदाराने अपलोड केलेली कागदपत्रे ही त्याची स्वत:ची असून ती बरोबर आणि खरी असल्याचे मान्य करत असल्याचे जाहीर करत असल्याचे नमूद असेल. प्रतिज्ञापत्राचा नमूना संकेतस्थळावरील (www.online.mspscindia.org ) डाऊनलोडमध्ये उपलब्ध असेल.** त्यानंतर अर्जदारास पेमेन्ट गेटवे मधून शुल्क भरता येतात.

यापूर्वीच्या पध्दतीनुसार अर्जदारास मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या कार्यालयात येण्यासाठी तारीख व वेळ निवडता येत होती. **आता बदल करण्यात आलेल्या पध्दतीनुसार अर्जदारास कागदपत्र पडताळणीसाठी परिषदेच्या**

**कार्यालयात समक्ष हजर राहण्याची आवश्यकता नाही.** सर्वसाधारणपणे अशी प्रक्रीया अवलंबिण्यात येत असली तरी आवश्यकता भासल्यास निबंधक , महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद हे अर्जदारास सर्व कागदपत्रांसह परिषदेच्या कार्यालयात हजर राहण्याबाबत कळवू शकतात किंवा योग्य त्या इतर प्राधिकरणाशी संदर्भ करू शकतात.

प्रथम महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून सदर प्रणालीत प्राप्त अर्जांची शुल्क पडताळणी केली जाईल. बँकेकडून शुल्क प्राप्त झाल्यावर महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेकडून अर्ज पडताळणीसाठी उपलब्ध होईल. नवीन पध्दतीमध्ये केलेल्या बदलानुसार परिषदेतर्फे कॉलेजेसना लॉगइन आयडी आणि पासवर्ड दिला जाईल. सदर लॉगइन आयडी व पासवर्ड परिषदेच्या **www.online.mspscindia.org** या प्रणालीत टाकून त्या त्या शैक्षणिक संस्थेतील अर्जदारांचे अर्ज व अपलोड केलेली कागदपत्रे जसे अंतिम वर्षाची गुणपत्रिका , कॉलेज सोडल्याचा दाखला इ. संबंधित प्राचार्य या प्रणालीत पाहू शकतील व शैक्षणिक अर्हता निश्चित करू शकतील.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेने विनंतीपत्राद्वारे फार्मसी महाविद्यालयांच्या (डिप्लोमा, डिग्री आणि फार्म.डी.कोर्स) मा. प्राचार्यांना त्यांच्या त्यांच्या शैक्षणिक संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून आणि निश्चित करण्यासाठी चेकबॉक्समध्ये टीक करण्याची विनंती केली आहे. महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेने पाठविलेल्या विनंतीपत्राद्वारे सर्व प्राचार्यांनी आतापर्यन्त सहकार्य केलेच आहे तसेच यापुढे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हता निश्चितीचे काम विनाशुल्क लवकरात लवकर अथवा सात कामाच्या दिवसांत करावे अशी विनंती केली आहे.

शुल्कनिश्चिती झालेले अर्ज त्याचवेळी परिषदेकडूनही पडताळण्यात येतील. परिषद कार्यालय व शैक्षणिक संस्थेकडून पडताळणी पूर्ण झाल्यावर अर्जावर पुढील कार्यवाही होईल. वैध अर्जदारास पंजीकरण क्रमांक दिला जाईल. पंजीकरण क्रमांक प्राप्त झाल्यावर अर्जदार त्याचा लॉग-इन आयडी टाकून प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट प्रिन्ट करून वापरू शकतात. पंजीकरण दाखला महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद कार्यालयात तयार करून स्पीड पोस्टाने अर्जदाराच्या पत्त्यावर पाठविला जाईल.

संबंधित सर्व अर्जदारांनी त्यांच्या सोयीसाठी केलेल्या कार्यपध्दतीच्या या बदलाची योग्य ती नोंद घ्यावी ही विनंती. तसेच सोबत जोडलेल्या फ्लोचार्टचे (मराठी / इंग्रजी) देखील अवलोकन करावे.

निबंधक<br>
महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

दि. ८/१०/२०१८